अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# लक्ष्मीपूजनामागची उदात्त संकल्पना

आज लक्ष्मीपूजन! दीपोत्सवातला महत्वाचा आणि एक प्रतिष्ठेचा दिवस. सगळ्या जगाचे चलन वलन जिच्या कृपेमुळे चालते त्या लक्ष्मीची आराधना करण्याचा आजचा दिवस. परंतु लक्ष्मीला केवळ चलनाच्या स्वरुपात पाहून चालणार नाही. म्हणून या लक्ष्मीपूजनाच्या दिवशी तिचा नेमका अर्थही समजून घेतला पाहिजे. पैसा अडका किंवा सगळ्या देवाणघेवाणीचे व्यवहार ज्या चलनात होतात तीच लक्ष्मी असे समजूत करून घेतल्यामुळे आज समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर अस्थिरता दिसून येते. लक्ष्मी ही स्थिर असली पाहिजे. म्हणून कुठल्याही मंगलकार्यामध्ये आशीर्वचन देताना स्थिर लक्ष्मी प्राप्तीरस्तु असे म्हटले जाते किंवा या लक्ष्मीची मुक्तकंठाने स्तुती केली आहे त्या श्रीसुक्तातही ताम आहव जातवेदो लक्ष्मीअनपगामिनीम् असे तिचे वर्णन केले आहे. अनपगामिनीम् म्हणजे परत न जाणारी आपल्या जवळ स्थिर राहणाऱ्या लक्ष्मीची स्तुती केली गेली. लक्ष्मी टिकवून ठेवायची असेल तर ती केवळ कडीकुलुपात किंवा बँकांमध्ये ठेवून स्थिर राहणार नाही. त्यासाठी मनुष्याला आपला दृष्टीकोन बदलावा लागेल. कारण चांगल्या मार्गाने मिळवलेलीच लक्ष्मी टिकून राहते. भ्रष्टाचाराने गैरकारभाराने चोऱ्या चपाट्या लांड्यालबाड्या करून मिळवलेला पैसा कधीही स्थिर राहात नाही. त्याला लक्ष्मी असेसुध्दा म्हणता येत नाही. असा पैसा ज्यांच्याकडे टिकतो त्यांना खऱ्या सुखाची आणि समाधानाची प्राप्ती होत नाही, हे सिध्द झालेले आहे. सन्मार्गाने प्रामाणिकपणे मिळवलेला पैसा स्थिर लक्ष्मीच्या रुपात घरात वास करतो. तीच व्यक्ती खऱ्या अर्थाने लक्ष्मीचा वसा टिकवून ठेवते. यासाठी नीतिमूल्ये, चांगले संस्कार, चांगले विचार आणि आपल्याकडे आलेल्या पैशाचा अधिकाधिक चांगला उपयोग अशा अनेक पैलूंचा समावेश होतो. प्राचीन काळी आजच्यासारखी नाणी किंवा रुपयांचे चलन नव्हते. तर वस्तूच एकमेकांना देऊन व्यवहार चालत होते. म्हणूनच शेतातून येणारे धान्य किंवा स्वत:कडे असलेले गोधन किंवा शेती याला एवढेच नव्हे तर घरामध्ये असलेल्या स्त्रीला देखील गृहलक्ष्मी म्हटले जाते. जीवनातले सगळे व्यवहार व्यापार पूर्ण करण्याकरता जे चलनवलन लागते, ते एक माध्यम असते. त्याला सर्वस्व म्हणता येणार नाही. आजच्या दिवशी लक्ष्मीची आराधना करताना सोनेनाणे पैशाची पूजा जरूर केली पाहिजे. परंतु, त्यासोबत मनाचे समाधान आणि आपण जपलेला नीतिमूल्यांचा विचार याचे देखील तितक्याच प्रामाणिकपणे स्मरण केले पाहिजे.

## लक्ष्मीचे अनेक अर्थ

लक्ष्मीचा हा वसा फार काळजीपूर्वक सांभाळावा लागतो. गडगंज पैसा जमा झाला की मनुष्याचा स्वभाव बदलतो. मस्ती अंगामध्ये चढते आणि उतलेमातलेपणातून हा वसा टाकून देण्याचाही गुन्हा त्याच्याकडून घडतो. म्हणूनच अतिशय काळजीपूर्वक आणि तितक्याच सावधानतेने लक्ष्मीचे पूजन केले पाहिजे. तिची आराधना केली पाहिजे. लक्ष्मीचा मान मोठा आहे म्हणून तिचा सन्मानही केला पाहिजे. याच श्रीसुक्तामध्ये आपल्याकडे येणारी लक्ष्मी हत्तीवर बसून यावी, अशी कामना व्यक्त करून तिचा सन्मान सांगितला गेला आहे. यावरून तिचे किती महत्व आहे हे लक्षात येते. आज केवळ पैशाच्या मागे धावणारा माणूस आणि भ्रष्टाचाराने मिळवलेला पैसा परदेशी बँकांमध्ये दडवणारे राजकारणी व्यापारी बघितले की, या सर्वांनी लक्ष्मी या शब्दाचा, लक्ष्मी या नावाचा आणि लक्ष्मी या उदात्त संकल्पनेचा किती चुकीचा अर्थ लावलेला आहे हे सिध्द होते. आजही भारताची समाजव्यवस्था का टिकून आहे असा जर विचार केला तर ती समाधानाने दोन घास खाणाऱ्या सामान्य आणि मध्यमवर्गीयांच्या नीतिमत्तेमुळे शिल्लक आहे. आजही देशातला सत्तर ते ऐंशी टक्के समाज हा एकमेकांवर विश्वास टाकून जगण्याचा प्रयत्न करतो. एकमेकांविषयी आदर व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. त्याच्याकडे भलेही करोडोची माया नसेल पण स्नेह प्रेम आणि विश्वास अशी फार मोठी संपत्ती त्याच्याकडे असते. ती त्याला खूप मोलाची वाटते. दिवसभराचे कष्ट त्यातून मिळालेले समाधान त्याला रात्रीची सुखाची झोप घेऊ देते. जीवनावर किती उत्कटतेने आणि पारदर्शकतेने प्रेम करता येते अशी प्रेरणा तो रोज प्राप्त करत असतो.

## लक्ष्मीपूजनातून समाधान हवे

कदाचित महाभारतामध्येसुध्दा युधिष्ठिराला यक्षाने जे प्रश्न विचारले त्यातला एक प्रश्न अतिशय महत्वाचा होता. तो प्रश्न होता को मोदते? या जगात आनंदी कोण आहे. युधिष्ठिराने त्याचे अतिशय समर्पक उत्तर दिले होते.तो मुळ श्लोक असा आहे की

पंचमेऽहनि षष्ठे वा शाकं पचति यो गृहे।
अनृणी चाप्रवासीच स वारिचर मोदते।

याचा अर्थ असा की भलेही एखादी व्यक्ती पाचव्या किंवा सहाव्या दिवशी स्वयंपाक करून जेवत असेल पण ज्याच्या डोक्यावर कोणाचेही देणे नाही जो कर्जमुक्त आहे. जो ऋणमुक्त आहे तो खरा आनंदी असा याचा भावार्थ आहे. आजच्या जगाचा प्रवास विरुध्द दिशेने सुरू आहे. अधिकाधिक आनंदी अधिकाधिक कर्ज घेतले पाहिजे अशा प्रकारची एक विचित्र प्रवृत्ती वाढीला लागली आहे.हे कर्ज घेऊन ते न फेडता आनंदी राहण्याचा बेगडी प्रयत्न समाज करत असतो. क्रेडीटकार्डावरचे हे आजचे जगणे लक्ष्मी या संकल्पनेचीच प्रतारणा करणारा आहे. आपल्या ज्ञानाने कौशल्याने आणि कष्टाने कमावलेला पैसा हीच खरी लक्ष्मी, ही धारणा अलिकडे कमी होते आहे. कमीत कमी श्रमामध्ये अधिकाधिक पैसा मिळाला पाहिजे आणि तो फक्त आपल्याकडेच राहिला पाहिजे. अशी स्वार्थी प्रवृत्ती वाढीला लागली आहे. यातून लक्ष्मीपूजनाचे कर्मकांड पूर्ण होत असेल पण स्थिर लक्ष्मीचे समाधान मिळत नाही.